# पौलाचे तीताला पत्र

**1** 1देवाचा सेवक व येशू ख्रिस्ताचा प्रेषित पौल याच्याकडून,
देवाच्या निवडलेल्या लोकांच्या विश्वासात त्यांना मदत
करण्यासाठी मला पाठवण्यात आले. त्या लोकांना सत्याची
ओळख करवून देण्यासाठी मला पाठवले व ते सत्य लोकांना
देवाची सेवा कशी करायची हे दाखवते. 2तो विश्वास आणि ते
ज्ञान अनंतकाळच्या जीवनाच्या आमच्या आशेमुळे येते. काळाची
सुरुवात होण्यापूर्वी देवाने त्या जीवनाचे अभिवचन आम्हांला
दिले, आणि देव खोटे बोलत नाही. 3देवाने आपल्या योग्य वेळी
त्या जीवनाविषयीचा संदेश जगाला प्रकट केला. देवाने ते काम
माझ्यावर सोपवले. त्या गोष्टीविषयी मी संदेश दिला कारण आमच्या
तारणाऱ्या देवाने मला तसे करण्याची आज्ञा केली होती.
4विश्वासातील माझा खरा मुलगा तीत याला मी लिहीत आहे.
देवपिता व प्रभू ख्रिस्त येशू आपला तारणारा यांच्याकडून तुला
कृपा, दया व शांती असो.

### तीताचे क्रेतातील कार्य

5मी तुला क्रेत येथे सोडून या कारणासाठी आलो की, जे अजून
अपूर्ण राहिले होते ते तू व्यवस्थित करावेस व मी तुला आज्ञा
केल्याप्रमाणे प्रत्येक गावी वडील नेमावेत. 6ज्याच्यावर दुराचरणाचा
दोष नसेल, ज्याला एकच पत्नी असेल, ज्याला मुले असून ती
विश्वासणारी असतील, ज्याच्यावर स्वैर जीवन जगल्याचा आरोप
नसेल, अशा प्रकारच्या व्यक्तींस नेमावे. 7कारण अध्यक्ष (सर्वांगीण
काळजीवाहक) हा देवाचा कारभारी असल्यामुळे तो दोषी नसावा,
तो उद्धट नसावा, त्याला लवकर राग येऊ नये; तो मद्यपान
करणारा नसावा, तो भांडणाची आवड नसणारा, अप्रामाणिकपणे
पैसे मिळवण्याची आवड नसणारा असावा. 8तर तो आदरातिथ्य
करणारा, चांगुलपणावर प्रेम करणारा, शहाणा, नीतिमान, भक्तीशील
व स्वतःवर संयम ठेवणारा असावा. 9विश्वसनीय संदेश जसा तो
शिकवला गेला त्याला दृढ धरून राहावे यासाठी की, हितकारक
शिक्षणाने लोकांना बोध करण्यास समर्थ असावे व जे विरोध
करतात, त्यांची चूक कौशल्याने त्यांना पटवून द्यावी.
10हे महत्त्वाचे आहे कारण पुष्कळ लोक बंड करणारे आहेत.
जे व्यर्थ गोष्टीविषयी बडबड करतात व लोकांना फसवतात. मी
विशेषेकरून, जे सुंता झालेले आहेत त्यांना संबोधून बोलत आहे.
11त्यांची तोंडे बंद केलीच पाहिजेत, ज्या गोष्टी शिकवू नयेत त्या ते
शिकवत आहेत. ते हे यासाठी करीत आहेत की, अयोग्य मार्गाने पैसे
मिळवावेत. अशा रीतीने ते संपूर्ण घराण्याचा नाश करीत आहेत.
12त्यांच्यापैकीच एक क्रेतीय संदेष्टा (भविष्यवादी) स्वतः म्हणाला,
क्रेतीय नेहमीच खोटारडे आहेत. दुष्ट पशू आणि आळशी, खादाड
आहेत. 13हे वाक्य खरे आहे. म्हणून नेहमीच त्यांना कडक रीतीने
धमकाव. यासाठी की, त्यांनी विश्वासात खंबीर व्हावे. 14आणि
यहूदी भाकडकथा व जे सत्य नाकारतात अशा लोकांच्या आज्ञांकडे
लक्ष देऊ नये.
15शुद्ध असणाऱ्या सर्वांना, सर्व गोष्टी शुद्ध आहेत; पण ज्यांचे
विचार व विवेकभाव ही दोन्हीही पापाने भ्रष्ट झाली आहेत व जे
विश्वास ठेवीत नाहीत त्यांना काहीच शुद्ध नाही. 16ते देवाला
ओळखत असल्याचा दावा करतात, पण ते त्यांच्या कृत्यांनी देवाला
ओळखल्याचे नाकारतात. ते अमंगळ व आज्ञा मोडणारे, व कोणतेच
चांगले कृत्य करण्यास लायक नसलेले असे त्यांचे त्यांनीच दाखवून
दिले आहे.

### खऱ्या शिक्षणाला अनुसरणे

**2** 1तू मात्र नेहमी सत्य किंवा निकोप शिक्षणाला शोभणाऱ्या
अशा गोष्टी बोल. 2वडील माणसांनी आत्मसंयमित,
आदरणीय व शहाणे असावे आणि विश्वासात, प्रीतीत व
सहनशीलतेत बळकट असावे.
3त्याचप्रमाणे वृद्ध स्त्रियांना आपल्या वागण्यात आदरणीय
असण्याबाबत शिकव. त्या चहाडखोर नसाव्यात, तसेच त्यांना
मद्यपानाची सवय नसावी व त्यांना जे चांगले तेच शिकवावे.
4यासाठी की, त्यांनी तरुण स्त्रियांना त्यांच्या पतींवर प्रेम करण्यास,
त्यांच्या मुलांवर प्रेम करण्यास शिकवावे. 5त्यांनी शहाणे व शुद्ध
असण्यास, त्यांच्या घराची काळजी घेण्यास व दयाळू असण्यास,
आपल्या पतींच्या अधीन असण्यास शिकवावे. यासाठी की देवाच्या
संदेशाची कोणालाही निंदा करता येऊ नये.
6त्याचप्रमाणे, तरुण मनुष्यांनी शहाणे व्हावे यासाठी त्यांना
उत्तेजन देत राहा. 7प्रत्येक गोष्टीत स्वतःला तू चांगल्या कामाचा
कित्ता असे दाखवून दे. तुझ्या शिक्षणात शुद्धता व गंभीरता असावी.
8ज्यावर कोणी टीका करू शकत नाही असा चांगल्या बोलण्याचा
उपयोग कर. यासाठी की, जे तुला विरोध करतात त्यांनी लज्जित
व्हावे.
9गुलामांना, सर्व बाबतींत त्यांच्या मालकांच्या अधीन
राहण्यासाठी व त्यांना संतोष देण्याविषयी व हुज्जत न घालण्याविषयी
शिकव. 10तसेच चोरी करू नये तर पूर्णपणे विश्वासूपणा
दाखवण्यास सांग. यासाठी की, त्यांनी आपला तारणारा देव याच्या
शिकवणुकीला सर्व बाबतींत सन्मान मिळवून द्यावा.
11कारण सर्व माणसांना देवाची तारक कृपा प्रगट झाली आहे.
12ती आम्हाला शिकवते की, आपण अभक्ती व ऐहिक गोष्टींची हाव
यांचा नकार करावा आणि या सध्याच्या जगात आपण सुज्ञपणाने व

नीतीने वागावे, व देवाप्रती आपली भक्ती प्रकट करावी. 13आणि
आपली धन्य आशा म्हणजे आपला महान देव व आपला तारणारा
येशू ख्रिस्त याच्या गौरवी प्रकट होण्याच्या दिवसाची आतुरतेने वाट
पाहावी. 14त्याने स्वतःला आमच्यासाठी दिले यासाठी की सर्व
दुष्टतेपासून त्याने खंडणी भरून आम्हांस सोडवावे व चांगली कृत्ये
करण्यासाठी आवेशी असलेले असे जे केवळ आपले लोक त्यांना
स्वतःसाठी शुद्ध करावे.

15या गोष्टीविषयी बोध करीत राहा आणि कडक शब्दांत
कानउघाडणी करीत राहा आणि हे पूर्ण अधिकाराने कर. कोणीही
तुला तुच्छ मानू नये.

### जगण्याचा योग्य मार्ग

3 1सत्ताधीश, आणि अधिकारी यांच्या अधीन राहण्याविषयी
व त्यांच्या आज्ञा पाळण्याविषयी व प्रत्येक चांगले काम
करण्यास तयार राहण्याविषयी, 2कोणाचीही निंदा न करण्याविषयी,
भांडण टाळण्याविषयी आणि सर्व माणसांना मोठी नम्रता
दाखविण्याविषयी त्यांना सतत आठवण करून देत राहा.

3मी हे सांगतो कारण आपणसुद्धा एके काळी मूर्ख, आज्ञा
न पाळणारे आणि बहकलेले असे होतो. आम्ही सर्व प्रकारच्या
वासनांची व विलासाची गुलामाप्रमाणे सेवा करणारे होतो. आम्ही
दुष्टतेचे व हेव्यादाव्याचे जीवन जगत होतो. इतर लोक आमचा
द्वेष करीत, आणि आम्ही एकमेकांचा द्वेष करीत होतो. 4पण
जेव्हा आमच्या तारणाऱ्या देवाची कृपा व प्रीती मानवाप्रती प्रकट
झाली, तेव्हा 5त्याने आम्हांला तारले. देवाकडून निर्दोष म्हणवून
घेण्यासाठी आम्ही केलेल्या कोणत्याही कृत्यांनी नव्हे तर त्याच्या
दयेमुळे आम्ही तारले गेलो आणि ते आमच्याकडे नव्या जन्माच्या
स्नानाद्वारे आम्ही नवीन जन्म पावलो आणि पवित्र आत्म्याद्वारे
प्राप्त झालेले नवीकरण यांनी तारले गेलो. 6देवाने तो पवित्र आत्मा
आमचा तारणारा येशू ख्रिस्त याच्या द्वारे विपुलपणे आम्हावर
ओतला. 7यासाठी की, आता देवाकडून त्याच्या कृपेमध्ये आम्ही
निर्दोष घोषित केले जावे. अनंतकाळच्या जीवनाच्या आशेने आम्ही
त्याचे वारस व्हावे. 8ही शिकवण विश्वसनीय आहे.

आणि यावर जोर द्यावा असे मला वाटते. यासाठी की, ज्यांनी
देवावर विश्वास ठेवला आहे, त्यांनी चांगली कृत्ये करण्याविषयी
काळजी घ्यावी. या गोष्टी लोकांसाठी चांगल्या व हिताच्या आहेत.

9परंतु मूर्खपणाचे वाद, वंशावळीसंबंधी चर्चा, भांडणे,
नियमशास्त्राविषयीचा झगडा टाळ. कारण ते निष्फळ व निरर्थक
असे आहेत. 10फूट पाडणाऱ्या व्यक्तीला एकदोन वेळा बोध करून
मग त्याला टाळ. 11कारण तुला माहीत आहे की, असा मनुष्य
वाइटाकडे वाहवत गेला आहे व तो पाप करीत आहे व त्याने
स्वतःलाच दोषी ठरविले आहे.

### लक्षात ठेवण्यासाठी काही गोष्टी

12जेव्हा मी अर्तमाला किंवा तुखिकाला तुझ्याकडे पाठवीन तेव्हा
मला भेटण्यासाठी निकपलिसास येण्याचा तू होईल तितका प्रयत्न
कर. कारण तेथे हिवाळा घालवण्याचे मी ठरवले आहे. 13जेना
वकील व अपुल्लो यांना त्यांच्या प्रवासासाठी ज्याची गरज भासेल
ती पुरवण्यासाठी तू सर्वतोपरी प्रयत्न कर. यासाठी की, त्यांना
कशाचीही कमतरता भासू नये. 14आपल्या लोकांनी चांगली
कृत्ये करण्याविषयी शिकले पाहिजे, यासाठी की तातडीच्या गरजा
भागवल्या जाव्यात, म्हणजे ते निष्फळ ठरणार नाहीत.

15माझ्याबरोबरचे सर्वजण तुला सलाम सांगतात. विश्वासामध्ये
आम्हावर प्रेम करणाऱ्या सर्वांना सलाम सांग.

देवाची कृपा तुम्हा सर्वांबरोबर असो.

नोंद